Received by Shri. S. T. Shinde Adv.
On 14/11/2022
Superintendent Addl. Dist. and Sessions C. Nilanga

# मा. जिल्हा व सत्र न्यायाधिश साहेब, निलंगा यांचे न्यायालयात

आर.सी.ए.क्र. 23 /2022

Exh. 1

**माधव सदाशिव बरमदे**
वय 72 वर्षे धंदा-शेती
रा. हासोरी ता. निलंगा जि. लातूर ....**अपीलंट**

**// विरुध्द //**

भारतबाई ~~भारस्बाई~~ **भ्र. श्रीधर बरमदे**
वय 64 वर्षे धंदा-घरकाम
रा. हासोरी ता. निलंगा जि. लातूर ....**गैरअपीलंट**

**प्रकरण :-** **वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

**सेवेत सविनय सादर**

मे. दिवाणी न्यायाधिश साहेब क.स्तर निलंगा यांचे कि.अर्ज क्र. 778/2022 मध्ये दिनांक 20/10/2022 रोजी जो निर्णय दिला आहे त्या निर्णयाचे विरुध्द अपील उजरदार तर्फे पुढील प्रमाणे मुदतीत सादर करण्यात येत आहे.

1. हे की,कि.अर्ज क्र. 778/2022 मध्ये दिलेला निर्ण्य हा बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टच्या नियमानुसार नसून लोअर कोर्टाने तो निर्णय देत असतांना कोणत्याही कसल्याही कायदेशीर बाबीचाविचार न करता दिलेला आहे म्हणून तो रद्दबातल होणे योग्य व अपरिहार्य आहे.

2. हे की, अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी कि.अर्ज क्र. 778/2022 हा दिल्यानंतर त्या बाबत मे. कोर्टातर्फे जाहिर प्रगटनाव्दारे उजरदारी मागविण्यात आली त्यानुसार उजरदार/अपीलंट

K.R. No 73
Dt. 14/11/2022

1) Civil RCA of 200=00
2) V.P. of 10=00
3) Address Memo —
4) List of documents alongwith (03) document. of 15=00
5) Affidavit of Appellant in support of Appeal. —
6) T.I. Application of 10=00
7) Affidavit of Appellant in support of T.I. Application —

Examined and ordered to be Registered as
Civil RCA

Date 14/11/2022
[signature]
I/c Superintendent
Addl. Dist. and Sessions Court,
Nilanga

RCA NO. 23/2022
21/11/2022

Order
21/11/2022

Issue notice to the Respondents R/on 21/12/2022.
[signature] 21/11/2022
I/C D.J.-1, Nilanga

O (Dt. 15/11/2024)

None appeared for the Appellant/Applicant, though the matter is for passing Dismissal order.

The applicant/Appellant does not appear to be interested to proceed the matter.

The matter is old. Hence, taken expeditiously.

The ~~application~~ Appeal is dismissed for want of prosecution.

[signature] 15/11/2024
DJ Nilanga (11.50 A.M.)

यांनी नि.क्र. 17 वर आपला उजरदारी अर्ज सदर केला. बॉम्बे रे. ॲक्ट नुसार एखादया वारस प्रमाणपत्रास उजरदारी प्राप्त झाली तर ते प्रकरण मा. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर साहेब यांचेकडे योग्य त्या निर्णयासाठी वर्ग करणे अपेक्षित असतांना प्रकरण स्वतःकडे ठेवून घेवून न्याय निर्णय दिला जो की कायदयाच्या विरुध्द आहे, तो रद्द होणे योग्य व अपरिहार्य आहे.

3. हे की, उजरदार यांचे म्हणणे असे की, मुळात सदाशिव बरमदे हे मुळ पुरुष होते त्यांच्या पत्नीचे नाव सोनाबाई होते. सदाशिव 2007 साली मयत तर सोनाबाई 2006 ला वारल्या. त्यांच्या पश्चात माधव, श्रीधर, पंचफुला, कोमल उर्फ लक्ष्मीबाई हे वारस आहेत. त्यांना मौजे हासोरी ता. निलंगा येथे जमिनी गट नं. 34/ब क्षेत्र 0 हे. 59 आर, गट नं. 37/ब क्षेत्र 14 आर, गट नं. 4/ब/1 क्षेत्र 0 हे. 04 आर, गट नं. 37/ब क्षेत्र 1 हे. 72 आर, गट नं. 77/क क्षेत्र 0 हे. 52 आर, गट नं. 82/ब क्षेत्र 2 हे. 12 आर, तसेच मौजे हरीजवळगा ता. लिनंगा येथे जमिन गट नं. 63 क्षेत्र 0 हे. 70 आर, गट नं. 66 क्षेत्र 0 हे. 64 आर, गट नं. 93/क क्षेत्र 1 हे. 41 आर या जमिनी एकत्र कुटुंबाच्या जमिनी आहेत त्यात उजरदार यांचा कायदेशीर हिस्सा आहे. उजरदार/ अपीलंट वरील जमिनीतील त्यांचा कायेदशीर हिस्सा मिळावा म्हणून मे. दिवाणी न्यायाधिश क.स्तर निलंगा येथे दिवाणी दावा दाखल केला असून ज्याचा दि.मु.नं. 1251/2022 हा असून त्यात सदरील गैरअपीलार्थी ही प्रतिवादी नं. 3 आहे.

4. हे की, वरील गोष्टी बाबत मे. कोर्टाने उजरदार/अपीलंट यांना आपला साक्षीपुरावा नोंदविण्याची परवानगी दयायला हवी होती

परंतु ती न देता कोणत्याही आणि कसल्याही प्रकारचा कायदेशीर गोष्टीचा अवलंब न करता निर्णय दिला आहे जो की बेकायदेशीर व चुकीचा आहे. रेस्पॉंडंट या निर्णयाचा गैरफायदा घेवून आपल्या नावची नोंद संबंधीत रेव्हेन्यू रेकॉर्डला लावून घेण्याचा प्रयत्न करीत आहे जो बेकायदेशीर आहे. उजरदार/अपीलंट यांना सदरील अपीलात घेतलेल्या मुद्यावरुन अपील पूर्णतः मंजूर होईल यांची खात्री आहे.

5. हे की, अपीलंट गैरअपीलार्थी विरुध्द तात्पुर्ता मनाई हुकुम मिळणेचा वेगळा अर्ज देत आहे.

6. हे की, सदरील अपीलमेमो ज्या गोष्टीचा उल्लेख केला नाही त्याचा उहापोह सदरच्या प्रकरणाच्या युक्तीवादाच्या वेळी करण्याची परवानगी अपीलंटला देण्यात यावी.

**तरी विनंती की,**

मे. साहेबांनी अपीलंटचे अपील मंजूर करुन किरकोळ अर्ज क्र. 778/2022 मध्ये दिनांक 20/10/2022 रोजी झालेला निर्णय रद्दबातल करण्यात यावा ही विनंती.

दिनांकः १५/11/2022

अपीलंट

तर्फे

**ॲड. एस.टी. शिंदे,**

औसा